# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
## Date – 07 November 2024
## Time 7.10 AM to 7.20 AM
## Language Marathi
## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक ०७ नोव्हेंबर २०२४ सकाळी ७.१० मि.

****

- राज्यात विधानसभा निवडणुकीसाठी प्रचाराला वेग
- महाविकास आघाडीच्या संयुक्त प्रचारसभेत काँग्रेसचा पंचसूत्री जाहीरनामा प्रसिद्ध
- गुणवंत विद्यार्थ्यांना आर्थिक मदत देण्यासाठी पीएम–विद्यालक्ष्मी योजनेला मंजुरी
- घड्याळ चिन्ह वाटपाचा विषय सध्या न्यायप्रविष्ट असल्याचं सर्व वर्तमानपत्रातून जाहीर करण्याचे सर्वोच्च न्यायालयाचे राष्ट्रवादी काँग्रेसला निर्देश

आणि

- मतदार जनजागृतीसाठी विविध उपक्रम

****

राज्यात विधानसभा निवडणुकीसाठी प्रचारानं आता वेग घेतला असून, विविध पक्षांच्या बड्या नेत्यांच्या जाहीर सभा होत आहेत.

महाविकास आघाडीची संयुक्त प्रचारसभा काल मुंबईत वांद्रे– कुर्ला संकुलात झाली. काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार तसंच शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अध्यक्ष उद्धव ठाकरे आणि मविआचे इतर नेते सभेला उपस्थित होते. विधानसभा निवडणुकीसाठी काँग्रेसचा पंचसूत्री जाहीरनामा यावेळी प्रसिद्ध करण्यात आला. महिलांना दरमहा तीन हजार रुपये अर्थसहाय्य देणाऱ्या महालक्ष्मी योजनेचा तसंच बेरोजगारांना चार हजार रुपये अर्थसहाय्याचा त्यात

समावेश आहे. भाजपाप्रणित लोकशाही आघाडी सरकारच्या धोरण आणि कार्यक्रमांवर नेत्यांनी यावेळी टीका केली.

****

दरम्यान, राहुल गांधी काल सकाळी नागपूर इथं संविधान संमेलनात सहभागी झाले होते. संविधान हे केवळ एक पुस्तक नसून, जीवन जगण्याचं माध्यम आणि तत्वज्ञान आहे, असं त्यांनी यावेळी नमूद केलं. तत्पूर्वी त्यांनी, नागपूर इथल्या दीक्षाभूमीत डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या मध्यवर्ती स्मारकाला भेट देऊन अभिवादन केलं.

****

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांची काल लातूर जिल्ह्यात रेणापूर इथं प्रचार सभा झाली. लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातले महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे उमेदवार संतोष नागरगोजे यांच्या प्रचारासाठी ही सभा झाली. राज्याचे विविध प्रश्न सोडवण्यासाठी महाराष्ट्राची सत्ता एकदा आपल्या हातात द्या, असं आवाहन मराठवाड्यातल्या या आपल्या पहिल्या सभेत ठाकरे यांनी केलं.

औरंगाबाद पूर्व मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार अतुल सावे यांनी काल भारतनगरमध्ये पदयात्रेद्वारे नागरिकांशी संवाद साधला.

****

मुंबईतल्या माहीम मतदारसंघात महायुतीचे अधिकृत उमेदवार सदा सरवणकर आणि मानखुर्द – शिवाजीनगर मध्ये सुरेश पाटील यांना रिपब्लिकन पक्षाने अधिकृत पाठींबा जाहीर केला आहे. पक्षाचे अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी काल ही माहिती दिली. रिपब्लिकन कार्यकर्त्यांना राज्यात सत्तेचा वाटा मिळवून देण्यासाठीच महायुतीला रिपब्लिकन पक्षाचा पाठींबा असल्याचं त्यांनी सांगितलं.

****

विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने मतदार जागृतीसाठी राज्य निवडणूक आयुक्तांतर्फे येत्या आठ नोव्हेंबर पासून मोबाईल व्हॅन्स सुरू करण्यात येणार आहेत. या व्हॅन्सवर मतदान जनजागृतीविषयक माहिती देण्यात येणार आहे. या गाड्या राज्यातल्या १५ जिल्ह्यांमध्ये मतदार जागृतीचं कार्य करतील.

****

आचारसंहिता काळात राज्यभरात सी–व्हिजिल ॲपवर एकूण दोन हजार ८३३ तक्रारी प्राप्त झाल्या असून, त्यापैकी दोन हजार ८१९ तक्रारी निवडणूक आयोगाकडून निकाली काढण्यात आल्या आहेत. मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयानं ही माहिती दिली. राज्य आणि केंद्र शासनाच्या विविध अंमलबजावणी यंत्रणांद्वारे करण्यात आलेल्या कारवाईत बेकायदा पैसे, दारू, अंमली पदार्थ आणि मौल्यवान धातू या स्वरूपात एकूण २८१ कोटी ७८ लाख रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

राज्यात येत्या २० तारखेला होणार्या विधानसभा निवडणुकीत मतदान करण्याचं आवाहन अभिनेत्री कविता मेढेकर यांनी केलं आहे.

****

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं 'आढावा विधानसभा मतदारसंघांचा' हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी सात वाजून १० मिनिटांनी आकाशवाणीवरुन प्रसारित होत आहे. या कार्यक्रमात आज अकोला आणि वाशिम या जिल्ह्यातल्या विधानसभा मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

****

गुणवंत विद्यार्थ्यांना आर्थिक मदत देण्यासाठी केंद्र सरकारनं पीएम–विद्यालक्ष्मी योजनेला मंजुरी दिली आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या काल झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आल्याचं, केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी पत्रकार परिषदेत सांगितलं. आर्थिक कमतरतेमुळे बुद्धिमान विद्यार्थी उच्च शिक्षणापासून वंचित राहू नयेत, या उद्देशानं मंजूर केलेल्या या योजनेत पात्र विद्यार्थ्यांना कोणत्याही तारणाशिवाय कर्ज मिळू शकेल, असं त्यांनी सांगितलं. याशिवाय, भारतीय अन्न महामंडळासाठी वर्ष २०२४–२५ मध्ये दहा हजार सातशे कोटी रुपयांच्या समभाग भांडवलाला मंजुरी दिल्याची माहिती वैष्णव यांनी यावेळी दिली. या निर्णयामुळे महामंडळाची कार्यान्वयन क्षमता वाढेल, असं त्यांनी नमूद केलं.

****

घड्याळ चिन्ह वाटपाचा विषय सध्या न्यायप्रविष्ट असल्याचं येत्या ३६ तासात सर्व वर्तमानपत्रातून जाहीर करावं, असे निर्देश, सर्वोच्च न्यायालयानं अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला दिले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या दोन्ही गटांमध्ये घड्याळ

या चिन्हांवरुन असलेल्या वादावर काल न्यायालयात सुनावणी झाली. दोन्हीं गटांनी ऐन निवडणुकीच्या काळात आपली ऊर्जा न्यायालयात भांडण्यात खर्च करण्यापेक्षा प्रचारावर भर द्यावा, असा सल्लाही न्यायालयानं यावेळी दिला.

****

निवडणूक प्रक्रिया राबवताना त्यात कोणत्याही शंकेला वाव राहू नये याची खबरदारी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी घ्यावी, आणि निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेला सर्वोच्च प्राधान्य द्यावं, असे निर्देश भारत निवडणूक आयोगाचे उपायुक्त हिर्देशकुमार यांनी काल निवडणूक यंत्रणांना दिले. छत्रपती संभाजीनगर, नागपूर आणि अमरावती विभागातल्या सगळ्या विधानसभा मतदारसंघांमधल्या निवडणूक पूर्वतयारीबाबत आढावा बैठक काल छत्रपती संभाजीनगर इथं पार पडली, त्यावेळी ते बोलत होते. या बैठकीला राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी उपस्थित होते. निवडणूक विषयक कामकाजाबाबत प्रत्येक टप्प्यावर राजकीय पक्ष आणि उमेदवारांच्या प्रतिनिधींना माहिती द्यावी, मतदान केंद्रांवर सर्व सुविधा पुरवाव्यात आणि मतदानाबाबत जनजागृती करावी, असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

****

विधानसभा निवडणुकीत ईव्हीएम मशिन हॅक करून विजयी करून देतो, असे सांगत नाशिकमधल्या शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उमेदवाराकडे ४२ लाख रूपयांची मागणी करणाऱ्या एका व्यक्तीला नाशिक पोलीसांनी अटक केली आहे. भगवानसिंग चव्हाण असं त्याचं नाव आहे. मध्य नाशिक विधानसभा मतदार संघातले उमेदवार वसंत गीते यांच्या मुंबई नाका इथल्या कार्यालयात जाऊन त्याने ही मागणी केली होती.

****

नांदेड जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय आणि रुग्ण सेवा मंडळ सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने मतदार जनजागृतीसाठी सेल्फी पॉइंटचं उद्घाटन काल महानगरपालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांच्या हस्ते झालं. “मतदाराला प्रोत्साहन म्हणून मतदानाच्या बोटाची शाई दाखवा आणि मोफत डोळे तपासणी करून घ्या” असा उपक्रम आयोजित केला आहे. यावेळी मोठया प्रमाणात मतदानाविषयी जनजागृती करण्यात आली. काल वाचनालयाच्या वतीने बाह्यरुग्ण विभागात आणि लसीकरण केंद्रात रुग्णाला दिल्या जाणाऱ्या पावती आणि

औषधाच्या कागदावर २० नोव्हेंबर २०२४ रोजी मी मतदान करणार तुम्ही पण करा, असा एक शिक्का देण्यात येत आहे.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या सिल्लोड मतदारसंघातल्या अनेक गावांमध्ये स्वीप अंतर्गत शिक्षक संचाने गायन आणि पथनाट्यातून मतदान जनजागृती केली.
धाराशिव जिल्ह्यातल्या तुळजापूर इथंही शिक्षकांनी आठवडी बाजारात नागरिकांशी संवाद साधून, मतदान जनजागृती केली.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात दिव्यांग आणि ८५ वर्षांपूढील नागरिकांसाठी येत्या १३ नोव्हेंबरपासून गृह मतदान सुरु होणार आहे. जिल्ह्यात असे चार हजार ४२४ मतदार आहेत. सिल्लोड मतदारसंघात १३ ते १६ नोव्हेंबर, पैठण, गंगापूर आणि कन्नड मतदारसंघात १५ ते १७, फुलंब्री १४ ते १७, औरंगाबाद मध्य आणि पश्चिम १३ ते १५, औरंगाबाद पूर्व १३ ते १८ आणि वैजापूर इथं १४ ते १६ नोव्हेंबर दरम्यान गृह मतदान होणार आहे.

****

परभणी तालुक्यातल्या नृसिंह पोखर्णी या ग्रामपंचायतीला नुकताच आयएसओ दर्जा प्राप्त झाला आहे. त्याबद्दल जिल्हा परिषदेच्या ग्रामपंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉक्टर संदीप घोन्सीकर यांच्या पथकानं काल या गावाला भेट देऊन विकास कामांची पाहणी केली. ग्रामपंचायत आयएसओ बनवल्याबद्दल तसंच ग्रामपंचायतीचे अभिलेखे अद्ययावत केल्याबद्दल घोन्सीकर यांनी यावेळी ग्रामपंचायतीचं अभिनंदन केलं.

****

पंढरपूर इथं होणाऱ्या कार्तिकी यात्रेला भाविकांच्या सोयीसाठी मध्य रेल्वेकडून तीन विशेष अनारक्षित गाड्यांचं नियोजन करण्यात आलं आहे. या गाड्या आठ ते १५ नोव्हेंबरदरम्यान विविध स्थानकांवरून पंढरपूरकडे जाणार आहेत. यामध्ये लातूर–पंढरपूर विशेष गाडी १२ आणि १३ नोव्हेंबर रोजी लातूर स्थानकावरून सकाळी साडे सात वाजता सुटेल आणि पंढरपूरला दुपारी १२ वाजून ५० मिनिटांनी पोहोचेल. पंढरपूर–लातूर ही विशेष गाडी १२ आणि १३ नोव्हेंबर रोजी पंढरपूरहून दुपारी एक वाजून ५० मिनिटांनी सुटेल आणि लातूरला संध्याकाळी सात वाजून २० मिनिटांनी पोहोचणार असल्याची माहिती रेल्वेच्या वतीने देण्यात आली आहे.

****

जालना तहसील कार्यालयातला तलाठी दुर्गेश गिरी याला पंचवीस हजार रुपयांची लाच घेताना काल लाचलुचपत प्रतिबंधक पथकानं अटक केली. तक्रारदाराच्या भूखंडाचा फेर घेण्यासाठी त्यानं ही लाच मागितली होती.

****

नांदेड जिल्हा राज्य उत्पादन शुल्क विभागानं दहा ठिकाणी धाडी टाकून एकूण दोन लाख ७४ हजार रुपयांची दारू जप्त केल्याची माहिती नांदेडचे राज्य उत्पादन शुल्क अधिक्षक गणेश पाटील यांनी दिली. याप्रकरणी दहा जणांना अटक करण्यात आली असून, गुन्हे दाखल झाले आहेत.

****

बुलढाणा जिल्ह्यात मध्यप्रदेशच्या सीमेवर जळगाव जामोद तालुक्यातल्या भिंगारा गावातल्या एका शेतात पोलिसांना ४५ क्किंटल गांजाची झाडे आढळून आली. याप्रकरणी दोन जणांना ताब्यात घेऊन, गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

****